# होय महाराजा

म्हणा कोविद कोरोना
गुमान घरात बसा
येता बाहेर मार खा
होय महाराजा ||१||

मात्र लसीचे पैसे मोजा
देतो मोफत इतर देशां
घरी काळ मी दारी दाता
होय महाराजा ||२||

भले झेलू दे साधू गोळया
तुम्ही वाजवा टाळया थाळया
बळी जा स्वातंत्र्याकरीता
होय महाराजा ||३||

गेले चंद्रावर यान
शेता पिके ना धान
बळी जातो बळीराजा
होय महाराजा ||४||

जगभर देशाची शान
चमके करा गुणगान
नेत्यांचे त्यांना किती जाण
होय महाराजा ||५||

कोणी घालवले फिरंगी
कोणी हटवली गरीबी
कोणी पटवली महती
देश कुठला नेते महान
होय महाराजा ||६||

– नारायण
१०/०७/२३